पुण्यनगरी 25.12.25

# चोरट्याकडून ३० दुचाकी जप्त



## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

## अन्य दोघेजण फरार

**नांदेड / प्रतिनिधी**

शहर व जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत दुचाकी चोरट्यांचा शोध घेण्याचे निर्देश पोलिस ठाणे प्रमुख व स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार स्थागुशा पथकाने एका चोरट्याकडून ३० दुचाकी जप्त करण्यात यश मिळविले.

जिल्ह्यातील किनवट माहूर परिसरात गोपनीय माहिती मिळाली की, काही जणांकडे मोठया प्रमाणात चोरलेल्या दुचाकी आहेत. या माहितीची खातरजमा करीत या पथकाने किनवट तालुक्यातील मौजे चिखली बु. फाटा येथून एका आरोपीला ताब्यात घेवून चौकशी केली असता त्याने आपले नाव शेख सलमा उर्फ सल्ला शेख महेबुब रा.चिखली ता.किनवट असे सांगितले. त्याची चौकशी केल्यावर त्याने आपण शेख अलताफ ऊर्फ कालू शेख अशरफ १९, शेख सोहेल शेख शौकत ऊर्फ गांजा २४ रा चिखली बु.ता.किनवट जि.नांदेड यांच्यासोबत विविध ठिकाणाहून दुचाकी चोरल्याची कबुली दिली. शेख सलमान ऊर्फ सल्ला हा चोरीच्या दुचाकी तेलंगणामध्ये ठेवून त्यांची विक्री करीत होता. नांदेड शहर व जिल्ह्यातील विविध पोलिस ठाणे व इतर पोलिस ठाण्यांतर्गत चोरलेल्या ३० दुचाकी त्याने तेलंगणातील आदिलाबाद जिल्ह्यातील इंचोडा मंडळातील सिरचलमा वन विभागाच्या जंगलात लपवून ठेवल्याचेही सांगत घटनास्थळी पोलिसांना नेले. पोलिसांनी नमूद ठिाणी जावून पाहणी केली असता तेथे वेगवेगळ्या कंपनीच्या रंगाच नंबर प्लेट नसलेल्या ३० दुचाकी आढळून आल्या. या सर्व दुचाकी ताब्यात घेत पथकाने यवतमाळ, लातूर,नांदेड जिल्ह्यातील अभिलेखाची पाहणी केली असता ३० पैकी १९ दुचाकीबाबत चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे व इतर ११ दुचाकीबाबत माहिती मिळू शकली नसल्याचे लक्षात आले. पोलिसांनी ११ लाखांच्या दुचाकी जप्त करुन अन्य दोन फरार आरोपींचा शोध सुरु केला आहे. आरोपी शेख सलमा उर्फ सल्ला शेख महेबुब याला वजिराबाद पोलिसांच्या ताब्यात दिले **(पान २ वर...)**